भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२७५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०४/२०१७

१) घराचा ताला तोडुन गोदरेज आलमारीचा कुंडा काढुन सोन्या चांदीचे दागीने व पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद :–

दि. १६/०४/२०१७ चे १६.३० ते १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही लग्न कार्यक्रमासाठी घराला ताला लावुन गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुन समोरील समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून घरात ठेवलेल्या गोदरेज आलमारीतील कुंडा काढुन गोदरेज आलमारीत ठेवलेला १ सोन्याचा मंगळसुत्र गहु पदक सहीत वजन १० ग्रॅम, दोन सोन्याच्या अंगठया प्रत्येकी ५ ग्रॅम वजन १० ग्रॅम, एक सोन्याची नथ वजन ३ ग्रॅम, दोन सोन्याच्या जिवत्या वजन २ दोन ग्रॅम, चांदीचे पायपटया १ जोड वजन ५० ग्रॅम, १ चांदीचे जोडवे, व नगदी २५,०००/रू. असा एकुन ९०,१००/रू. माल चोरून नेल्याने फिर्यादी सौ. जोसना मोहन खंडारकर वय ३३ वर्ष रा. सानगडी यांचे तोंडी रिपोर्ट ओ.पी. सानगडी येथे दिल्याने ओ.पी. सानगडी चे आकरन्स क्र. २४/१७ दि. १६/०४/२०१७ वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५४,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

२) ट्रव्हल्स बसमधिल बॅटऱ्या चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १७/०४/२०१७ चे ०१.३० ते ०५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे ट्रॅव्हल्स क्र. एमएच. ३५/१४४४ ही घरा शेजारी आवारात उभी ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुन ट्रॅव्हल्स बसची बॅटरी होल्ड नट, बोल्ट काढुन युवराज कंपनीच्या १२ होल्टच्या २ नग बॅटऱ्या किंमती १०,०००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी हेमकृष्ण पंडरी वाढीभस्मे वय ४४ वर्ष रा. सिव्हील वार्ड साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

३)अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १४/०४/२०१७ चे ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी वय १३ वर्ष ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर जंयतीचे शाळेत कार्यक्रम आटपुन एकटीच पायवाटेने एमआयटी कॉलेज जवळुन गावी जात असतांना यातील आरोपीने फिर्यादीचे रस्त्यात हाथ पकडुन माझे सोबत बोलत नाही असे म्हणुन डोक्याचे केस ओढतान करून फिर्यादीचा विनयभंग केल्याने फियादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३५४ (अ)(ड) भादंवि. सहकलम ३(१)(डब्लु)(i) अ.जा. ज.अ,प्र.का. सन २०१२ सहकलम १२ पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास श्री. जोगदंड,उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा, हे करीत आहेत.

४) विवाहीतेला अश्लिल शब्दात बोलुन तीच्या पतीसोबत भांडन शिवीगाळ, काठीने डोक्यावर मारून धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १६/०४/२०१७ चे २१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे मिना कुंभरे यांचे शेतात काळया तोडण्यास गेले असता आरोपीने फिर्यादीस अश्लिल शब्दात बोलुन विनयभंग केल्याने, यातील फिर्यादीचा पती आरोपीस तु माझ्या पत्नीला अश्लिल शब्दात का बोललास असे हटकण्यास गेला असता आरोपीने फिर्यादी चे पती सोबत भांडन करून काठीने डोक्यावर मारून मारण्यापिठण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,३५४,(अ)५०४,५०६ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

५) संगनमत करून हयगयीने तेंदुपत्ता फडीकरिता कचरा साफ करण्यास आग लावल्याने शेतात रचुन ठेवलेल्या धानाचे, तनसीचे जळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–

दि. १७/०४/२०१७ चे १०.३०ते १२.३० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून तेंदुपत्ता फडी लावण्यासाठी ठेक्याने घेतलेल्या शेत जमिन जागेवरील कचरा साफ करण्यास आग लावुन अन्य कोणत्याही व्यक्तीस दुखापत, नुकसान होण्याचा संभव असतांना सुद्धा हयगयी करून आगीला जळतांनी सोडुन त्याबाबत कोणतीही खबरदारी न घेता पळुन गेल्याने फिर्यादी व त्याचे शेत शेजारील कास्तकार सुरेश बाळबुधे असे दोन्ही कास्तकाराचे प्रत्येकी तीन एकर शेतातील धानाचे, तनसीचे रचुन ठेवलेल्या ढिंगाना व जलावु काळया जाळुन एकुन ५०,०००/रू. चे नुकसान केल्याने फिर्यादी विलास काशिनाथ बाळबुधे वय ३७ वर्ष रा. भुयार यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८५,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

६) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक १७/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. साकोली, लाखनी, लाखांदुर येथे अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १० लिटर ६२० मीली लीटर देशी दारू किंमती २,९५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १७/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०७, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.